ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## संघर्षात वाढ होत आहे

लोकसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असून यात अर्थसंकल्पावर चर्चा होणे अपेक्षित आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन म्हटल्यावर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार तसेच इतर चर्चा अपेक्षित असते. सभागृहातील सदस्य यावर चर्चा करीत असतात. अर्थसंकल्पावर चर्चा होणे अपेक्षित असताना ईतर बाबीवर चर्चा होताना दिसून येत आहे. काही झाले तरी विरोधक आक्रमक दिसून येत आहेत. लोकशाहीच्या मंदीरात कोणताही वाईट प्रकार घडू नये या बाबत काळजी सभापती घेत असतात. सध्याला विरोधकांच्या हाती ठोस असे काही लागत नसल्याने की, काय चौकीदार चोर है।, मतचोरी व मतदान यंत्रातील गडबड आदि आरोप केले जात होते व होत आहेत. अर्थसंकल्पावर कमी बोलतांना दिसून येत नाहीत. वास्तविक विचार व्यक्त केले पाहिजेत. सध्याला जे पुस्तक भारतात प्रकाशित झाले नाही अशा पुस्तकावर चर्चा घडविली जात आहे. या पुस्तकात काय आहे. जे समजले असल्याने, त्यात चीनची चाल लिखित केल्याचे दिसून येत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून चीनची घुसखोरी चालूच आहे. चीन हा बलाढ्या देश आहे. मोठ्या यंत्राच्या माध्यमाद्वारे डोंगर पोखरून काढत असून रस्ते व रेल्वे सेवा करण्यात येत आहे. भारताचा काही भाग गिळंकृत केला आहे. तो विद्यमान पंतप्रधान किंवा सरकारच्या काळात घडले नाही. पंडित नेहरू पासून इंदिरा गांधी यांच्या काळात हे घडलेले प्रकरण आहे. यावर पंतप्रधान मोदी यांनी दम दिला आहे. येथे अत्याधुनिक शस्त्रासह सैन्य तैनात केले आहे तरी चीन हा सर्वात कपटी देश आहे. चीनची घातकी चाल ही सर्वांना माहिती आहे. भारतीय तीन्ही दलाच्या कमांडरने ही बाब लक्षात आणून दिली आहे. भारताने याकडे दुर्लक्ष केले असे म्हणता येत नाही. भारत हा सतत संघर्ष करीत आला आहे. गलवान भाग व काही घुसखोरी केलेला भूभाग चीनने गिळंकृत केला आहे हे मान्य केले पाहिजे. याबाबत विद्यमान सरकारला जबाबदार धरता येत नाही. पुर्वीचे काँग्रेस व युपीए सरकार जबाबदार आहे. दुसरे असे की, नरेंद्र मोदी यांच्या अगोदर डॉ. मनमोहनसिंग यांचे सरकार होते. त्यांना पंतप्रधान म्हणून पुर्ण अधिकार होते का हा संशोधनाचा विषय आहे. सरकार कोण चालवित होते. डॉ. सिंग यांच्यावर कोणाचा दबाव होता हे सर्वांना माहिती आहे. असे असताना एखाद्या अधिकाऱ्याने मत व्यक्त केले असेल व ते पुस्तक प्रकाशित झाले नसेल तर लोकसभेत अधिवेशन काळात संघर्ष करणे टाळले पाहिजे. राहूल गांधी यांच्या हाती पक्षाचे सुत्रे दिल्यापासून पक्षाला यश मिळत नाही. यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. काँग्रेस पक्षाला मोठे अपयश येत आहे. त्यापेक्षाही राहुल गांधी परदेशात जातात, त्यावेळी भारताची बदनामी करीत असतात. भारतीय लोकशाहीबाबत परदेशात संशय घेणे योग्य नाही. जेवढे सत्ताधारी जबाबदार आहेत त्यापेक्षा दुप्पट हे विरोधी पक्षवाले आहेत. लोकशाहीत विरोधकाची भुमिका मजबुत असली पाहिजे. असे जरी असले तरी प्रत्यक्षात जे विरोधकांचे काम चालू आहे ते समाधानकारक नाही. लोकसभापती महोदयांनी जी जाहीर माहीती सांगितली ती अतिषय खेदजनक आहे. पंतप्रधान मोदी यांना घेरण्याचा प्रयत्न होणार होता. महिला सदस्य तेही दलित सदस्यांना पुढे केले होते. ही घटना जसे महोदय सभापतीं यांनी सांगितली ती घडली असती तर देशाची मोठी बदनामी झाली असती. वेळीच सावध झाले व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना त्या दिवशी सभागृहात उपस्थित राहू नये असा सल्ला दिला गेला, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. यावरून विरोधकांची वाईट चाल किती भयाण होती हे कळून येते. देशात जे वादाचे मुद्दे होते त्याची सोडवणुक झालेली आहे. जम्मूकाश्मीरात ३७० कलम हटविला गेला. राममंदिराची उभारणी झाली. जम्मू काश्मीरात शांतता निर्माण होत आहे. सर्वात महत्वाचे बॉम्बस्फोटात निष्पात लोकांचा बळी जात होते ते स्फोट बंद झाले. याचा अर्थ काँग्रेस अतिरेक्यांचे लाड करीत होता तो लाड पंतप्रधान मोदी यांनी बंद केला. ज्या घटना काँग्रेसच्या काळात घडल्या त्यावर काँग्रेस बोलत नाहीत. मतासाठी देशविरोधात काम केले गेले हा आरोप चुकीचा नाही. डॉ. मनमोहनसिंग हे बॉम्बस्फोट रोखू शकले नाहीत. जम्मू काश्मीरात शांतता प्रस्थापित करू शकले नाही. एवढे काय जम्मूकाश्मीरातून हिंदुंना हाकलून दिले, आयाबहिणीवर अत्त्याचार झाले त्यावेळी काँग्रेसने कोणता पक्का निर्णय घेतला. उलट मतासाठी लाड केल्याचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून आला. हा इतिहास साक्ष असताना नको ते मुद्दे लोकसभेत चर्चिले जावेत म्हणून संघर्ष होताना दिसून येत आहे. काँग्रेसची भुमिका वरचेवर संशयस्पद दिसून येत आहे. काँग्रेसचे राहूल गांधी यांचे बिनबुडाचे आरोप करीत असल्याने जनतेचा पाठींबा मिळत नाही. देशातील जनता काँग्रेसला नाकारत आहे यामागील कारणाचा शोध घेतला पाहिजे. संविधान बाबत भावनिक बोलले जात आहे. घटनेला कोणी हात लावू शकत नाही. घटनेवरून राजकारण केले जात आहे हे वाईट बाब आहे. दलितांना योग्य मान-सन्मान मिळाला पाहिजे. तो काँग्रेसले मिळवुन दिला नाही. देशात सध्याला काय घडत आहे, देशातील घडामोडीवर देश वाशियांचे लक्ष लागून आहे. बारकाईने लक्ष वेधले जर देशाचे प्रथम नागरिक नरेंद्र मोदी यांना टार्गेट केले जात आहे. अपशब्द वापरले जात आहेत. देशातील नागरिक काँग्रेसी वाटचालीवर नाराज आहेत. याचा परिणाम निवडणुकीच्या निकालावरून दिसून येत आहे. आता देशात होणाऱ्या काही राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला मोठे अपयश येण्याची शक्यता आहे. अजूनही चार राज्यातील निवडणुकीची तयारी काँग्रेसकडून दिसून येत नाही. केवळ लोकसभेत व बाहेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या घालणे हा एककलमी कार्यक्रम दिसून येतो. वास्तविक नेहरू-गांधी घराण्यातील देशाविषयी केलेल्या कार्य उघड पडत आहेत. जनता तुलनात्मक मत व्यक्त करीत आहे. यामुळे काँग्रेसची प्रतिष्ठा लयास जात आहे. जम्मूकाश्मीरमधील हिंदुची हत्त्या होताना, हिंदुची आब्रुलुटत असताना कोणती भुमिका काँग्रेसने घेतली. सत्ता तर काँग्रेसची होती. हा विचार आता भारतीयांच्या मनात सतावत आहे. त्यामुळे आतातर लोकसभाअध्यक्षांनी जे जाहिर विचार व्यक्त केले आहेत यावरून भारतीयांना सावध राहीले पाहिजे. काही झाले तरी चीन हा भारताला मित्र म्हणून परवडणारा नाही. त्यापेक्षाही काँग्रेसची सध्याची चाल देखिल परवडणार नाही. त्यामुळे विचार करून भारतीयांनी वाटचाल करावी लागणार आहे.

# जीवन, विचार, सामाजिक परिवर्तन आणि मानवतेचे दीपस्तंभ



भारतीय संत परंपरेत समाज प्रबोधनाचे, नैतिक मूल्यांचे आणि मानवतेचे दीपस्तंभ म्हणून संत सेवालाल महाराजांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ते बंजारा (लमाण) समाजाचे महान संत, समाजसुधारक आणि आध्यात्मिक मार्गदर्शक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनातून सत्य, परिश्रम, प्रामाणिकपणा, समता, करुणा आणि बंधुभाव यांचा संदेश दिला. म्हणूनच संत सेवालाल महाराजांची जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नसून, त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते आचरणात आणण्याचा पवित्र दिवस आहे.

**संत सेवालाल महाराजांचे बालपण व व्यक्तिमत्त्व**

संत सेवालाल महाराजांचा जन्म साध्या बंजारा कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यात विलक्षण बुद्धिमत्ता, निरीक्षणशक्ती आणि करुणा दिसून येत होती. समाजातील गरिबी, अज्ञान, अन्याय आणि दुःख पाहून त्यांच्या मनात समाजपरिवर्तनाची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांनी सांसारिक लोभ, लालसा आणि स्वार्थापेक्षा समाजहिताला अधिक महत्त्व दिले. साधे राहणीमान, संयमी आचार-विचार आणि उच्च नैतिक मूल्ये हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते.

**सामाजिक परिस्थिती**

संत सेवालाल महाराजांच्या काळात बंजारा समाज अनेक सामाजिक कुप्रथांनी ग्रासलेला होता. व्यसनाधीनता, चोरी, हिंसा, अंधश्रद्धा आणि शिक्षणाचा अभाव यामुळे समाज मागासलेला होता. या परिस्थितीमुळे

समाजाच्या प्रगतीला अडथळे निर्माण होत होते. संत सेवालाल महाराजांनी या समस्यांची मूळ ओळखून त्यावर उपाय सुचवले आणि समाजाला योग्य दिशा दिली.

**समाजसुधारणेचे कार्य**

संत सेवालाल महाराज हे केवळ उपदेशक नव्हते, तर कृतीशील समाजसुधारक होते. त्यांनी चोरी, व्यसन आणि हिंसा यांसारख्या वाईट प्रवृत्तींना ठाम विरोध केला.

''परिश्रम हाच खरा धर्म आहे'' हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांनी प्रत्येकाला कष्ट करून प्रामाणिक जीवन जगण्याचा संदेश दिला. अन्यायाने किंवा फसवणुकीने मिळवलेली संपत्ती त्यांनी नाकारली आणि श्रमातून मिळालेल्या अन्नालाच पवित्र मानले.

**धार्मिक व नैतिक विचार**

संत सेवालाल महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन अत्यंत व्यापक होता. धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर सदाचार आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले. सत्य बोलणे, दुसऱ्याच्या हक्कावर गदा न आणणे, गरजूंची मदत करणे, वृद्धांचा सन्मान करणे आणि स्त्री-पुरुष समानता पाळणे, हीच खरी धार्मिकता आहे, असे ते सांगत. सर्व धर्मांचा सन्मान करावा, जात-पात, उच्च-नीच भेद न करता मानवतेला सर्वोच्च स्थान द्यावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

स्त्रीपुरुष समानता आणि सामाजिक न्याय

त्या काळात स्त्रियांच्या अधिकारांकडे अपेक्षित तेवढे लक्ष दिले जात नव्हते. संत सेवालाल महाराजांनी स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट पुरस्कार केला. स्त्री ही पुरुषाइतकीच सक्षम आहे, तिचा सन्मान झाला पाहिजे, असा त्यांनी आग्रह धरला. सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमान यांचा संदेश देत त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणला.

**निसर्गप्रेम व पर्यावरणविषयक दृष्टी**

संत सेवालाल महाराजांना निसर्गाविषयी अपार प्रेम होते. झाडे, पशुपक्षी आणि पर्यावरण यांचे संरक्षण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे, असे ते मानत. निसर्गाचा समतोल राखल्यासच मानवाचे जीवन सुखी व समृद्ध होईल, ही त्यांची ठाम धारणा होती. आजच्या पर्यावरणीय संकटांच्या पार्श्वभूमीवर त्यांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात.

**सामाजिक सलोखा व बंधुभाव**

समाजात ऐक्य नसेल, तर प्रगती शक्य नाही, हे संत सेवालाल महाराजांनी ओळखले होते. त्यांनी सर्व समाजघटकांमध्ये बंधुभाव वाढवण्याचा प्रयत्न केला. परस्पर सहकार्य, प्रेम आणि विश्वास यांवर समाज उभा राहतो, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे समाजात सलोखा आणि आत्मसन्मान वाढला.

**संत सेवालाल महाराजांचा समाजावर प्रभाव**

संत सेवालाल महाराजांच्या विचारांमुळे बंजारा समाजात मोठे परिवर्तन घडून आले. व्यसनमुक्ती, प्रामाणिक श्रम, शिक्षणाची आवड आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढण्यास त्यांच्या शिकवणीचा मोठा वाटा आहे. त्यांच्या विचारांनी समाजाला आत्मविश्वास दिला आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा दिली.

**जयंतीचे महत्त्व आणि आजची उपयुक्तता**

संत सेवालाल महाराजांची जयंती विविध ठिकाणी मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते. या दिवशी प्रवचने, कीर्तन, सामाजिक प्रबोधन कार्यक्रम, स्वच्छता मोहिमा, वृक्षारोपण आणि गरजूंसाठी मदतकार्य केले जाते. जयंती साजरी करण्याचा खरा अर्थ म्हणजे त्यांच्या विचारांचे आचरण करणे होय. आजच्या स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात सत्य, परिश्रम आणि मानवतेचा मार्ग दाखवणारे त्यांचे विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात.

संत सेवालाल महाराज हे केवळ एका समाजाचे संत नव्हते, तर संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक होते. त्यांचे जीवन हे सत्य, श्रम, करुणा आणि समतेचा जिवंत आदर्श आहे. आधुनिक युगातही त्यांच्या विचारांची गरज अधिक जाणवते. संत सेवालाल महाराजांचा आदर्श स्वीकारून आपण प्रामाणिक, सदाचारी आणि समाजोपयोगी जीवन जगलो, तरच त्यांच्या जयंतीचे खरे सार्थक होईल.

---०००---

**रणजित पवार,**
**उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# कॉपीयुक्त की कॉपीमुक्त?



महाराष्ट्र राज्यात नुकत्याच इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षांना सुरुवात झाली असून, २० फेब्रुवारीपासून इयत्ता दहावीच्या परीक्षाही सुरू होत आहेत. प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी देखील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांनी ''कॉपीमुक्त परीक्षा अभियान'' प्रभावीपणे राबवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. परिपत्रकांद्वारे लोकप्रतिनिधींचा सहभाग, विद्यार्थ्यांना कॉपीमुक्तीची शपथ, पालक सहभाग, शिक्षक-विद्यार्थी-पालक समुपदेशन, कॉपीमुक्तीचे महत्त्व पटवून देणारे उपक्रम, तसेच शाळा व परीक्षा केंद्र परिसरात जनजागृती फेरी व रॅली यांसारखे कार्यक्रम राबवण्यात आले.

या सर्व उपाययोजनांबरोबरच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत प्रत्येक परीक्षा केंद्र सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली ठेवण्याचे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे बहुतांश केंद्रांवर सीसीटीव्ही व्यवस्था उभारण्यात आली आहे. परीक्षा यंत्रणेमध्ये बैठे पथक, भरारी पथक, शिक्षण विभागाचे अधिकारी, महसूल विभाग, पोलीस प्रशासन, शिक्षकवर्ग यांचा सहभाग घेऊन राज्य सरकार व मंडळामार्फत कॉपीमुक्त परीक्षा राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, शिक्षण सचिव, शिक्षण आयुक्त, जिल्हाधिकारी, मंडळाचे अध्यक्ष, शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक यांनीही विद्यार्थ्यांना भयमुक्त, कॉपीमुक्त व चिंतामुक्त वातावरणात परीक्षा देण्यासाठी आवाहन केले आहे.

तरीही, बारावीच्या परीक्षांना सुरुवात झाल्यापासून राज्यभरात कॉपीच्या अनेक घटना उघडकीस आल्या. यामध्ये विद्यार्थी, कॉपी पुरवणारे शिक्षक, केंद्रप्रमुख, बैठे व भरारी पथक या यंत्रणेचा सहभाग दिसून आल्याने राज्याची प्रतिमा राज्यभरातच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवरही नकारात्मकरीत्या अधोरेखित झाली आहे. ही प्रतिमा अन्यायकारक नसून वास्तव परिस्थितीचेच प्रतिबिंब आहे. त्यामुळे प्रश्न उरतो की, चूक नेमकी कुठे आहे? चूक नेमकी कोणाची आहे? कोणत्या उपाययोजना कमी पडत आहेत? आणि कॉपी का केली जाते?

जर आपण फक्त दहावी-बारावी बोर्ड परीक्षांमधील कॉपीकडे पाहिले, तर या समस्येचे मूळ समजून घेणे शक्य नाही. प्रत्यक्षात इयत्ता पहिलीपासून बारावीपर्यंत, तसेच पदवी, पदव्युत्तर शिक्षण आणि मुक्त विद्यापीठांपर्यंत सर्रासपणे कॉपीयुक्त परीक्षा होत असल्यानेच ही साखळी निर्माण झाली आहे. शाळा स्तरावर होणाऱ्या अनेक परीक्षा प्रत्यक्षात कॉपीमुक्त नसतात. त्यामुळे विद्यार्थी वर्षानुवर्षे या पद्धतीला सरावतात आणि बोर्ड परीक्षेच्या काळात ही प्रवृत्ती उघडकीस येते.

शाळा असोत किंवा खाजगी क्लासेस, अनेक ठिकाणी कॉपी, पेपरफोड यांसारख्या प्रकारांना समाजमान्यता मिळते. यात विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजघटक परस्परावलंबी पद्धतीने सहभागी होतात आणि प्रत्यक्षात स्वतःचीच मोठ्या प्रमाणात फसवणूक करून घेतात. ही फसवणूक केवळ गुण मिळवण्यासाठी नसून मूल्यशून्य शिक्षणपद्धतीला खतपाणी घालणारी आहे. त्यामुळेच आम्ही सातत्याने शाळा स्तरावरील सर्व परीक्षा कॉपीमुक्त असाव्यात, यासाठी आग्रही भूमिका घेतली आहे.

इयत्ता पाचवी-आठवी शिष्यवृत्ती परीक्षा, इयत्ता आठवी एन.एम.एम.एस. परीक्षा तसेच इतर सर्व शालेय स्पर्धा परीक्षांचा अभ्यास केला, तर तिथेही फार वेगळी परिस्थिती आढळून येत नाही. मात्र समाज या परीक्षांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहत नसल्याने आपली चिंता केवळ दहावी-बारावीपुरती मर्यादित राहते. प्रत्यक्षात ही एक संपूर्ण साखळी आहे आणि ती मोडून काढणे अत्यावश्यक आहे. मात्र आपण फक्त शासन आणि प्रशासन यांना दोष देऊन आपल्या जबाबदारीपासून मुक्त होऊ शकत नाही, तसेच आपल्या कर्तव्यापासून दूर राहू शकत नाही.

याच संदर्भात शाळा स्तरावर होणाऱ्या पॅट, नास, निपुण यांसारख्या शाळा मुल्यांकन परीक्षांकडे गांभीर्याने पाहणे अत्यंत आवश्यक आहे. या परीक्षादेखील अनेक ठिकाणी कॉपीमुक्त होत नाहीत, याची अनेक उदाहरणे यापूर्वीही आपण पाहिलेली आहेत. विशेषतः पॅट परीक्षेची पेपरफुटी झाल्यानंतर शिक्षण आयुक्त यांच्यामार्फत थेट कारवाई करण्यात आली होती, हे उदाहरण आपल्या सर्वांच्या स्मरणात आहे. ही घटना अत्यंत गंभीर असून, शाळा स्तरावरील परीक्षांमध्येही कॉपीचे प्रकार किती खोलवर रुजले आहेत, हे स्पष्टपणे दर्शवते. जर शालेय स्तरावरच परीक्षांची शुचिता राखली जात नसेल, तर विद्यार्थ्यांकडून उच्चस्तरीय नैतिक मूल्यांची अपेक्षा करणे हे केवळ दिखावा ठरेल.



हे खरे आहे की राज्यातील अनेक शाळा आणि खाजगी संस्था अत्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत. लातूर पॅटर्नसारख्या उपक्रमांमुळे गुणवत्तेची देशपातळीवर ओळख निर्माण झाली आहे. मात्र काही अपवादात्मक पण गंभीर घटनांमुळे संपूर्ण राज्याची प्रतिमा डागाळली जाते. त्यामुळे केवळ दहावी-बारावी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त करून प्रश्न सुटणार नाही. तर इयत्ता पहिलीपासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंत, तसेच विशेषतः मुक्त विद्यापीठांच्या परीक्षांमध्ये व्यापक सुधारणा करून सर्वच परीक्षा कॉपीमुक्त करणे ही काळाची गरज आहे.

आज गरज आहे ती परीक्षा म्हणजे केवळ गुण मिळवण्याचे साधन न मानता, ती ज्ञान, कौशल्य, आत्मविश्वास आणि चारित्र्य घडविण्याची प्रक्रिया मानण्याची. विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, मेहनत, शिस्त आणि जबाबदारी या मूल्यांचे महत्त्व लहान वयातच पटवून देणे आवश्यक आहे. पालकांनीही फक्त गुणांवर लक्ष केंद्रित न करता, मुलांच्या नैतिक विकासाकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षकांनी मार्गदर्शक, प्रेरणादायी भूमिका बजावली पाहिजे, तर शाळा प्रशासनाने पारदर्शक, शिस्तबद्ध आणि मूल्याधिष्ठित परीक्षा व्यवस्था उभारणे आवश्यक आहे.

दहावी-बारावी बोर्ड परीक्षांच्या निमित्ताने राज्यात घडलेल्या घटनांमुळे झालेली मानहानी भरून काढण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वांवर जितकी आहे, तितकीच समाजातील प्रत्येक घटकाचीही आहे. या सकारात्मक परिवर्तनासाठी योगदान देणे, कॉपीयुक्त संस्कृतीचा मुळापासून नायनाट करणे आणि शालेय स्पर्धा परीक्षेसह इयत्ता पहिलीपासून पदव्युत्तर पदवी शिक्षणापर्यंत सर्वच परीक्षा कॉपीमुक्त करणे हेच या प्रश्नावरचे एकमेव, प्रभावी आणि शाश्वत उत्तर आहे.

**गोविंद शिंदे**
**मुख्याध्यापक,**
**स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर.**
**तथा सदस्य, जिल्हा गुणवत्ता कक्ष, लातूर.**
**मो.९८५०६४५१६३**

# जिद्द, चिकाटी आणि स्वप्नांचा विजय लातूरचा महादेव येमले बनला क्लास-१ अधिकारी!



**लातूर/प्रतिनिधी :** ''जिद्द आणि चिकाटी असेल, तर यश दूर नसते,'' या उक्तीला साजेसा प्रेरणादायी प्रवास करत हिप्परसोगा (ता. जि. लातूर) येथील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र महादेव काशीबाई विठ्ठलराव येमले यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या २०२४-२५ राज्यसेवा परीक्षेत घवघवीत यश संपादन करून क्लास-१ अधिकारी पद मिळवले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण लातूर जिल्ह्यात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महादेव येमले यांचे प्राथमिक शिक्षण लातूर येथील ज्ञानेश्वर विद्यालयात झाले, तर माध्यमिक व पदवीचे शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालयात पूर्ण झाले. पुढे त्यांनी पुणे येथील कॉलेजमधून केले. शासकीय सेवेत अधिकारी बनण्याच्या ध्यासाने त्यांनी च्या अभ्यासाला सुरुवात केली.

अत्यंत सर्वसाधारण आणि आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या शेतकरी कुटुंबातून आलेल्या महादेव यांनी कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय स्वतःच्या अभ्यासावर विश्वास ठेवून अथक परिश्रम केले. या संघर्षमय प्रवासात त्यांचे मामा तुळशीराम कोयले यांनी आर्थिक पाठबळ देत त्यांना खंबीर साथ दिली. अनेक वेळा मुख्य परीक्षा देऊनही अपेक्षित यश मिळाले नाही, मात्र त्यांनी हार न मानता अभ्यास सुरूच ठेवला.

मधल्या काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली लहान भाऊ अमोल येमले सहाय्यक नगर रचनाकार झाले, तर मावस बहिण दिपाली मोरमपल्ले सहाय्यक राज्यकर आयुक्त बनल्या. तरीही महादेव यांना यश मिळण्यास विलंब होत होता. अनेकांनी अभ्यास सोडण्याचा सल्ला दिला, पण ''मन के जीते जीत, मन के हारे हार'' या विश्वासावर त्यांनी संयमाने प्रयत्न सुरू ठेवले.

अखेरीस त्यांच्या अथक मेहनतीचे फळ मिळाले आणि नुकत्याच जाहीर झालेल्या राज्यसेवेच्या निकालात / पदासाठी त्यांची क्लास-१ अधिकारी म्हणून निवड झाली.

''कर्म केले त्याची फळ
वाया कोण देईल!
जे पेरावे ते उगवेल,
हे तत्व जाणावे!''

महादेव येमले यांचा संघर्षमय प्रवास आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. सातत्य, संयम आणि ठाम निर्धार असेल, तर कठीण परिस्थितीतही मोठे यश मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

महादेव येमले म्हणाले :

''आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करणे हीच माझ्यासाठी सर्वात मोठी गोष्ट आहे. या प्रवासात अनेकदा अपयश आले, पण कुटुंब आणि मित्रांनी दिलेल्या धीरामुळे मी उभा राहिलो. स्पर्धा परीक्षेत संयम आणि सातत्य टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.''

मातोश्री काशीबाई येमले यांची भावना :

''त्याच्या प्रयत्नांना यश मिळाले, यातच आमचा आनंद आहे. मुलाचा आम्हाला खूप अभिमान वाटतो.''

वडिलांचे मत :

''तो मोठा अधिकारी व्हावा, हे आमचं स्वप्न होतं. ते त्याने पूर्ण केलं. आमच्या कुटुंबाचं नाव उज्ज्वल केलं यापेक्षा एका पित्याला आणखी काय हवं!''

महादेव येमले यांचा हा प्रेरणादायी प्रवास केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण युवकांसाठी जिद्द आणि ध्येयाने जगण्याचा संदेश देणारा ठरत आहे.

# ''संशोधन लेखन मसुदा'' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पी.जी. प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने ''संशोधन लेखन मसुदा'' या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश लक्ष्मणराव कुंडलवार, सहयोगी प्राध्यापक, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ यांनी संशोधन लेखनाची रूपरेषा, लेखन पद्धती, संशोधनातील महत्त्वाचे घटक तसेच संशोधन लेख सादरीकरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जी.आर. लहाने, डॉ. बी.टी. चव्हाण व डॉ. एम.एस. आष्टेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. सूत्रसंचालन रेश्मा सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. अनुजा कांबळे, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील, प्रा. सुहाना शेख व प्रा. अमृता बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसह संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून, संशोधन लेखनाबाबत नवे दृष्टिकोन मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली.

# कॅन्सर उपचारावर आता आयुर्वेदाचीही जोड



कर्करोग उपचारात भारत आता मोठे पाऊल घेत आहे.
कर्करोगावरील उपचार आता फक्त औषधानेच नाही तर आयुर्वेदाच्या साहाय्यानेही केले जाणार आहे.
रुग्णकेंद्रित कर्करोग उपचारासाठी आयुष–ॲलोपॅथी समन्वयाचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे.
कर्करोगावरील उपचार आता केवळ आधुनिक औषधोपचारांपुरते मर्यादित न राहता आयुर्वेद आणि अन्य आयुष पद्धतींच्या सहाय्याने अधिक परिणामकारक करण्याच्या दिशेने भारताने ठोस पाऊल टाकले आहे. नवी मुंबईतील ॲक्ट्रेक–टाटा स्मारक केंद्रात आयोजित 'समाकलन २.०' राष्ट्रीय एकात्मिक कर्करोग उपचार परिषद' या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरली असून, ॲलोपॅथीबरोबर आयुर्वेदाचा संगम साधत रुग्णकेंद्रित आणि सर्वसमावेशक उपचार पद्धती विकसित करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. कर्करोग प्रतिबंध, उपचार आणि उपचारानंतरच्या काळात आयुष प्रणालींचा आधुनिक कर्करोग उपचारांसोबत पुराव्यावर आधारित वापर कसा करता येईल, यावर या परिषदेत सखोल चर्चा झाली. कर्करोग उपचारासाठी आयुष अंतर्गत औषध शोध आणि विकास उत्कृष्टता केंद्राच्या मार्गदर्शनाखाली, सीसीआरएएसच्या सहकार्याने आणि भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या पाठिंब्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.
'नेचरकॅन' कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डेटाबेसचे लोकार्पण
यावेळी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते ॲक्ट्रेकमध्ये विकसित करण्यात आलेल्या 'नेचरकॅन' या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डेटाबेसचे लोकार्पण करण्यात आले. औषधी वनस्पतींच्या कर्करोग प्रतिबंध उपचारावरील वैज्ञानिक साहित्यावर आधारित हा डेटाबेस संशोधकांसाठी महत्वाचे साधन ठरणार आहे, परंपरा आणि नवकल्पना यांचा संगम साधत, ॲलोपॅथीसह आयुर्वेदाचा वापर करून कर्करोगावर अधिक प्रभावी उपचार शक्य असल्याचा विश्वास या परिषदेतून व्यक्त करण्यात आला असून, समाकलन २.० परिषद भारतातील एकात्मिक कर्करोग उपचार क्षेत्राला नवी दिशा देणारी ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.


**एकात्मिक आरोग्यसेवा ही काळाची गरज**

टाटा स्मारक केंद्रचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे यांनी पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधणारी एकात्मिक आरोग्यसेवा ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. पुराव्यावर आधारित आयुष उपचारांमुळे रुग्णांची उपचार सहनाशक्ती वाढते, जीवनमान सुधारते आणि मानक कर्करोग उपचारांना पूरक आधार मिळतो, असे त्यानी स्पष्ट केले. ॲक्ट्रेकचे सवालक डॉ. पंकज चतुर्वेदी यांनी आयुष आधारित उपचाराचे शास्त्रीय मूल्यमापन करण्यासाठी ॲक्ट्रेकमध्ये इन–सिलिको, इन–विट्री, व्यवस्था उभारण्यात आल्याची माहिती दिली. इन–विवों आणि क्लिनिकल संशोधनाची मजबूत व्यवस्था उभारण्यात आल्याची माहिती दिली.
डॉ. प्रमोद सावंत (मुख्यमंत्री, गोवा) म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र नेतृत्वाखाली आयुष उपचारांना आधुनिक वैद्यकासोबत जोडण्याचे प्रयत्न सुरू असून, टाटा मेमोरियल सेंटर आणि ऑल इंडिया इर्नस्टिट्यूट ऑफ आयुर्वेद, गोवा यांसारख्या संस्थांच्या सहकार्याने सर्वसामान्यांसाठी सर्वांगीण कर्करोग उपचार उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे.

**वास्तव अभ्यास आवश्यक**

आयुष केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. विक्रम गोटा यानी आयुषमधील संभाव्य उपचार घटकांची ओळख, त्यांची कार्यपद्धती, सुरक्षितता आणि परिणामकारकता यांचा सखोल अभ्यास सुरू असल्याचे नमूद केले.

## किडनी–स्टोन



साधारणपणे, मूत्रपिंड मूत्राच्या मदतीने कचरा बाहेर काढतात. परंतु जेव्हा मूत्रातील काही पदार्थ जास्त प्रमाणात केंद्रित होतात तेव्हा ते स्फटिकरूप होऊन एकत्र चिकटू शकतात, ज्यामुळे शेवटी दगड तयार होतात.
लहान दगड लक्षात न येता मूत्रमार्गातून जाऊ शकते.मोठे दगडतथापि, ते मूत्रमार्गात अडथळा आणू शकतात, ज्यामुळे तीव्र वेदना, रक्तस्राव किंवा संसर्ग देखील होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये, उपचार न केल्यास ते मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात.
जागरूकता का महत्त्वाची आहे
जर तुम्हाला एकदा किडनी स्टोन झाला असेल, तर तो पुन्हा होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते–अभ्यास असे सूचित करतात की ५० वर्षांत १५%. यामुळे हे समजून घेणे महत्त्वाचे बनते की जोखीम घटक, सुरुवातीची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक पावले पुनरावृत्ती कमी करण्यासाठी. किडनी स्टोन बद्दल महत्वाचे तथ्ये मूत्रपिंडातील दगड म्हणजे **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

# उपदेशकथा:कष्टाचे महत्त्व



एका नगरीत एक धनिक राहात होता. त्याला पाच मुले होती. त्या सर्वांची त्याने लग्ने केली. पहिल्या चारही भावांच्या बायका घरकामात आळशी होत्या. कामावरून त्यांच्यात भांडणे होत असत. पाचवी सून गरीब घरातील व सुशिक्षित होती. तिने आल्याबरोबर पाहिले की, घरकाम करायला कोणीही पुढे येत नाही. ती रोज पहाटे उठून सर्व घरकाम करू लागली. स्वादिष्ट भोजन बनवून सर्वांना जेवायला वाढून मग स्वत: जेवू लागली. त्यामुळे सासू तिच्यावर खुश झाली. सासू तिला म्हणाली, 'तुला एकटीलाच सर्व काम करावे लागते म्हणून तुला राग येत नाही का? तेव्हा ती म्हणाली, 'सासूबाई कामाने काही कोणी मरत नाही. उलट चांगला व्यायाम होतो व शरीर निरोगी राहते. स्वत:च्याच घरचे काम करण्यात लाज कसली? हे सर्व जावांनी ऐकले व लज्जेने त्यांची मान खाली गेली. तेव्हा त्यांना समजले की घरचे काम सगळ्यांनी मिळून केले तर घरात आणखीनच आनंद निर्माण होईल.कथा

# अमेरिकी बदाम



भारतीय आयातीत वस्तूंवर शुल्कमाफी रद्द करून अमरिकेने गेल्या महिन्यात एका व्यापारयुद्धाला तोंड फोडले. त्यावर प्रत्युत्तरादाखल भारतानेही कारवाई करून अमेरिकेतून आयात होणाऱ्या वस्तूंवरील शुल्क वाढविले.
त्याची झळ आता अमेरिकेतील बदाम उत्पादकांना बसत असून त्यांच्या दृष्टीने बदाम कडू झाले आहेत.
अमेरिकेने काही दिवसांपूर्वी भारताचा ङ्गजनरलाईज्ड सिस्टिम ऑफ प्रेफरेन्सफ (जीएसपी) हा दर्जा रद्द केला होता. अमेरिकेचा हा व्यापारी कार्यक्रम असून त्या अंतर्गत अमेरिका भारतासारख्या विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी मदत करत असे. या दर्जामुळे भारताला आतापर्यंत सर्वाधिक फायदा होत असे आणि दरवर्षी भारतातून ५.६ अब्ज डॉलरची निर्यात होत असे. त्यावर कोणतेही शुल्क लागत नसे.
त्याला उत्तर म्हणून काही दिवसांनी अमेरिकेतून आयात होणाऱ्या २९ वस्तूंवरचे शुल्क वाढविले होते. त्यात बदामाचाही समावेश होता.
बदामाच्या बाबतीत अमेरिकेचा जवळजवळ एकाधिकार असून जगभरात बदामाच्या एकूण निर्यातीत एकट्या कॅलिफोर्निया प्रांताचा ८२ टक्के वाटा आहे. सुमारे ७,००० उत्पादक बदामाची शेती करतात. अल्मँड बोर्ड ऑफ अमेरिका संस्थेच्या अंदाजानुसार, या उद्योगामुळे कॅलिफोर्नियात एक लाखापेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण होतात. आता बदामावर भारताने लावलेल्या शुल्कामुळे या सर्वांवर असर होण्याची भीती तेथील उद्योजकांना आहे. अल्मँड बोर्डाने नवी दिल्लीत आपले कार्यालय उघडले आहे. त्याचे जाहिरातीचे वार्षिक बजेट ६० लाख डॉलरचे आहे.
एवढेच नव्हे तर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री माईक पॉम्पिओ हे गेल्या आठवड्यात भारताच्या दौऱ्यावर आले होते. ही भेट मुख्यत: इराणवरील निर्बंधांबाबत आहे, असे सांगण्यात आले. मात्र कॅलिफोर्नियाच्या एका संसद सदस्याने त्यांना बदामावरील शुल्काचा मुद्दा भारतीय अधिकाऱ्यांकडे उपस्थित करण्याची मागणी केली. अमेरिकेतील कॅलिफोर्नियाचे बदाम भारतात निर्यात केले जातात. त्यावरचा वाढीव आयात कर रद्द करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, असे अमेरिकी काँग्रेस सदस्य जोश हार्डर यांनी पॉम्पिओ यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले होते. यावरून या बदाम उत्पादकांसाठी भारत किती महत्त्वाचा देश आहे याची कल्पना येईल.
नव्या शुल्कामुळे सोललेल्या बदामांची किंमत पाऊंडमागे १२ सेंटने म्हणजेच २० टक्क्यांनी वाढेल. बिन सोललेल्या बदामांची किंमतही सुमारे १७ टक्क्यांनी वाढेल. फ्पाहायला गेलो तर हा आकडा खूप मोठा वाटत नाही मात्र आमच्या निर्यातीसाठी चीनशिवाय भारत हाच एक मुख्य पर्याय होता,ङ्ग असे अल्मँड बोर्डाच्या अध्यक्षा जूली ॲडम्स यांनी सांगितले. या शुल्कांच्या दीर्घकालीन परिणामांचा विचार करणे चिंतादायक आहे, असे त्या म्हणतात.
त्यातच भर म्हणजे अमेरिकेने चीनसोबत सुरू केलेल्या व्यापारयुद्धामुळे तेथेही हाच प्रकार घडला आहे. गेल्या वर्षी बदामावर चीननेही आयात शुल्क वाढविले होते. त्यावेळी बदाम उत्पादकांना मोठा फटका बसला होता कारण चीनने अमेरिकी बदामांवर ५० टक्के शुल्क लावले होते. अल्मँड बोर्डाच्या माहितीनुसार, ते शुल्क वाढल्यानंतर अमेरिकेतून चीनला होणाऱ्या निर्यातीत एक तृतीयांश घट झाली आहे.
फआम्ही एखाद्या देशातील बाजारपेठेतील समस्या हाताळू शकतो मात्र अनेक देशांमध्ये असे होत असेल तर त्यावर मार्ग काढणे एक आव्हान बनते, असे अमेरिकेतील ट्रॅव्हेले अँड फिपेन इंक या कंपनीचे डेव्हिड फिपेन यांनी एका वृत्तसंस्थेला सांगितले. ही कंपनी बदामांचे उत्पादन आणि प्रक्रियेचे काम करते. अमेरिकेतून २०१७–१८ मध्ये भारतात सुमारे ६५ कोटी डॉलर किमतीच्या बदामांची निर्यात झाली होती. त्याच वर्षी चीन आणि हाँगकाँगला सुमारे ५४.९ कोटी डॉलरच्या बदामांची निर्यात झाली होती. याचाच अर्थ भारतातून मागणी कमी झाली तर अमेरिकी बदाम उत्पादकांना जास्त फटका बसू शकतो. याचे पडसाद भारतातही उमटणार आहेत. भारतात बदामांची निर्यात कमी झाली तर बाजारात ते कमी उपलब्ध होतील. त्यामुळे बदाम आणखी महाग होतील. यामुळे अनेक जण बदाम विकत घेणेच सोडून देतील, अशी भारतीय विक्रेत्यांना भीती आहे. भारतात बदाम मुख्यत: काश्मीरात पिकविला जातो. त्याच्या लागवडीखाली २४०० हेक्टर क्षेत्र असून त्यापासून ५६०० क्विंटल बदामाचे उत्पादन होते. हिमाचल प्रदेशात २०० हेक्टरात बदामाचे पीक काढतात आणि उत्तर प्रदेशातील डोंगराळ भागात सुमारे ५००० हेक्टरात अक्रोड व बदाम यांची लागवड केली आहे. अर्थातच देशातील मागणीच्या दृष्टीने हे उत्पादन अपुरे आहे. त्यामुळे आधीच महागडे असलेले बदाम घेण्यासाठी आणकी किंमत मोजण्याची तयारी ठेवायला हवी.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



**(मागील अंकावरुन...)**साधारणपणे, मूत्रपिंड मूत्राच्या मदतीने कचरा बाहेर काढतात. परंतु जेव्हा मूत्रातील काही पदार्थ जास्त प्रमाणात केंद्रित होतात तेव्हा ते स्फटिकरूप होऊन एकत्र चिकटू शकतात, ज्यामुळे शेवटी दगड तयार होतात. लहान दगड लक्षात न येता मूत्रमार्गातून जाऊ शकते.मोठे दगडतथापि, ते मूत्रमार्गात अडथळा आणू शकतात, ज्यामुळे तीव्र वेदना, रक्तस्राव किंवा संसर्ग देखील होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये, उपचार न केल्यास ते मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतात.

## २ Joke विनोद




बाबू – तुझे वडील किती वर्षाचे आहेत.
राजू – माझ्याच वयाचे आहेत.
बाबू – अरे पण हे कसं शक्य आहे.
राजू – का नाही शक्य? अरे मी जन्मलो, नि ते वडील बनले ना स!

## ३ Message संदेश



Santa's Morning workout
santa 2 doctor-apne kaha tha ki subah khelne se sehat thik rehti hai pr muje to koi fark nai pada?
doctor-konsa game khelteho?
santa-mobile mai snake wala .


## ४ Thought सुविचार



पवित्र असावे पण पतित होऊ नये.
**अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**
**अनागतं य: कुरुतेस शोभते ।**
**स शोचते यो न करोत्यनागतम्॥**
अर्थ: जो आगामी संकटाचा विचार करतो तो सुखी असतो आणि जो त्याचा विचार करीत नाही त्याला दु:ख सोसावे लागते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या–चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत–बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म–मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त



### टीम इंडिया पाकिस्तानी खेळाडूंशी हॅन्डशेक करणार का? सूर्यकुमारने सांगितले

दिल्ली–१५ फेब्रुवारी रोजी श्रीलंकेच्या कोलंबो येथे भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात टी २० वर्ल्ड कप २०२६ चा ग्रुप स्टेज सामना खेळवला जाणार आहे. आशिया कप २०२५ मध्ये झालेल्या तीनही सामन्यात भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानच्या खेळाडूंशी हॅन्डशेक करणे टाळले. एवढंच काय तर टॉस दरम्यान सुद्धा सूर्यकुमार यादवने पाकिस्तानी फलंदाज सलमान अली आगा सोबत हॅन्डशेक केला नाही. भारताने ही भूमिका पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर घेतली होती. मात्र आता वर्ल्ड कपमधील सामन्यात पुन्हा एकदा पाकिस्तानचा संघ आमनेसामने आला असताना टीम इंडिया पाकिस्तान विरुद्ध नो हॅन्डशेकचा त्यांचा निर्णय कायम ठेवणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### उस्मान तारिकचा सामना करण्यासाठी अश्विनने सांगितला

**दिल्ली**–भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये होणारा हाय व्हॉल्टेज सामना १५ फेब्रुवारीला कोलंबोतील आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळ–वला जाणार आहे. या सामन्याआधी पाकिस्तानच्या फिरकी गोलंदाजाची जोरदार चर्चा रंलगी आहे. फिरकी गोलंदाज उस्मान तारिकने टी–२० वर्ल्डकप स्पर्धेत आतापर्यंत दमदार गोलंदाजी केली आहे. तो चेंडू कधी रिलीज करतो, याचा फलंदाजांना अचूक अंदाज घेता येत नाही. त्यामुळे फलंदाजांचा फटका फसतो. त्याच्या साईडआर्म गोलंदाजीचा सामना करताना फलंदाज अडचणीत आल्याचं दिसून आलं आहे. दरम्यान भारत–पाकिस्तान सामन्याआधी भारताचा स्टार गोलंदाज आर. अश्विनने उस्मान तारिक गोलंदाजीला आला की भारतीय फलंदाजांनी काय करायला हवं? याबाबत सल्ला दिला आहे.उस्मान तारिकला गोलंदाजीत यश मिळण्याचं एकमेव कारण म्हणजे, तो हातातून चेंडू सोडण्याआधी थांबतो. त्यामुळे फलंदाजांना शॉट खेळताना अडचण येते. अश्विन म्हणाला, जर उस्मान तारिक गोलंदाजीला आला आणि चेंडू सोडण्याआधी तो थांबला, तर भारतीय फलंदाजांनी एकच काम करावं ते म्हणजे क्रीज सोडून बाहेर जावं. हे पूर्णपणे कायदेशीर आहे. हेच जर सतत घडत राहिलं, तर अंपायर उस्मान तारिकला वॉर्निंग देतील.

### आमिर सोहेलचा उद्दामपणा आणि वेंकटेश प्रसादचे खणखणीत प्रत्युत्तर

**कराची**–भारत पाकिस्तान सामने आणि वादविवाद यांचे नाते जुने आहे. १९९६ वर्ल्डकपमधली बंगळुरू इथे झा–लेली लढत पाकिस्तानचा आमिर सोहेल आणि भारताचा वेंकटेश प्रसाद यांच्यातील जुगलबंदीने गाजली होती. भारत पाकिस्तान क्रिकेटमधल्या नाट्यमय घटनांपैकी ती एक आहे. त्या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी स्वीकारली. नवज्योतसिंग सिद्धू आणि अजय जडेजा यांच्या .. खेळींच्या बळावर भारताने २८७ धावांची मजल मारली. त्याकाळी ही धावसंख्या दमदार मानली गेली. कारण तेव्हा अडीचशे पार धावसंख्या पोहोचणं हे मोठं लक्षण मानलं जात असे. पाकिस्तानसाठी आमिर सोहेल आणि सईद अन्वर यांनी खणखणीत सलामी दिली. दोघांनाही सामना जिंकण्याच्या उद्देशाने फटकेबाजी सुरू केली. आमिर–सईद यांच्या आक्रमक इराद्यामुळे पाकिस्तानने १४.४ षटकात १०९ अशी भरारी घेतली होती. वेंकटेश प्रसादच्या षटकात आमिर सोहेलने ऑफसाईडला चौकार लगावला. त्यानंतर आमिरने प्रसादला उद्देशून बाऊंड्रीच्या दिशेने बॅट दाखवली. असा चेंडू टाकशील तर चौकार पिटाळेन असं सोहेलला सुचवायचं होतं.शांत आणि मितभाषी स्वभावाच्या प्रसादने लगेच प्रत्युत्तर दिलं नाही.

# आफ्रिकेचा न्यूझीलंडवर दणदणीत विजय



४४ चेंडूत ८६ धावांची खेळी



**न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ७ गडी राखून विजय मिळवला आहे**

**नवी दिल्ली:** आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील २४ वा सामना न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला. न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी १७६ धावांचे आव्हान ठेवले होते. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेकडून कर्णधार एडेन मारक्रमने दमदार अर्धशतकी खेळी केली. दक्षिण आफ्रिकेने दिलेलं आव्हान षटकात पूर्ण केलं. या खेळीच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने हा सामना ७ गडी राखून आपल्या नावावर केला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने ७ गडी बाद १७५ धावा केल्या. न्यूझीलंडकडून सलामीला आलेला टीम सेफर्ट अवघ्या १३ धावा करून माघारी परतला. तर फिन ॲलेनने ३१ धावा केल्या. तर रचिन रवींद्र अवघ्या १३ धावा करून माघारी परतला. ग्लेन फिलिप्सलाही या सामन्यात फ्लॉप ठरला. तो १ धाव करून माघारी परतला. तर मार्क चॅपमनने ४८ धावांची दमदार खेळी केली. तर डॅरिल मिशेलने ३२ धावांचे योगदान दिले. शेवटी जिमी निशमने नाबाद २३ धावांची खेळी करून न्यूझीलंडची धावसंख्या ७ गडी बाद १७५ धावांवर पोहोचवली.

दक्षिण आफ्रिकेला हा सामना जिंकण्यासाठी १७६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना अपेक्षित सुरूवात मिळाली. सलामीला आलेल्या एडेन मारक्रम आणि क्विंटन डी कॉक यांनी चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत पहिल्या विकेटसाठी ६२ धावा जोडल्या. क्विंटन डी कॉक १४ चेंडूत २० धावा करून माघारी परतला. त्यानंतर मारक्रमने रायन रिकल्टनसोबत मिळून डाव सांभळला आणि ७ षटकात संघाची धावसंख्या १०० पार पोहोच–वली. रायन रिकल्टन २१ धावा करून माघारी परतला. पण एडेन मारक्रमने एक बाजू धरून ठेवली होती.

डेवाल्ड ब्रेव्हिस १७ चेंडूत २१ धावांची खेळी करून माघारी परतला. तर कर्णधार एडेन मारक्रम शेवटपर्यंत खेळपट्टीवर टिकून राहिला. त्याने ४४ चेंडूत ८६ धावांची खेळी केली. त्याला साथ देत डेव्हिड मिलरने २४ धावांची खेळी केली. यासह दक्षिण आफ्रिकेला हा सामना ७ गडी राखून जिंकून दिला.

# आयर्लंडच्या कर्णधाराचा कहर

कोलंबो–आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये ओमान विरूद्धच्या सामन्यात आयर्लंडचा प्रभारी कर्णधार लॉर्कन टकरने ५१ चेंडूत चार षटकार आणि दहा चौकार मारत नाबाद ९४ धावा केल्या. टकरच्या वादळी खेळीमुळे ओमानने २० षटकांत पाच बाद २३५ धावा केल्या तर ओमानचा डाव १८ षटकांत १३९ धावांत आटोपला. आयर्लंडने सामना ९६ धावांनी जिंकला तसेच धावगती सुधारत ब गटात चौथे स्थान पटकावले. टकरने ओमान विरुद्ध १८४.३१ च्या स्ट्राईक रेटने खेळत चौकार आणि षटकारांची आतषबाजी केली तसेच नव्या विक्रमांची नोंद केली. त्याने पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये कर्णधार म्हणून सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत दुसरे स्थान पटकावले. या यादीत ९८ धावा करत वेस्ट इंडिजचा ख्रिस गेल पहिल्या तर टकर नाबाद ९४ धावांसह दुसऱ्या स्थानी आहे. यादीत तिसऱ्या स्थानी भारताचा रोहित शर्मा आहे. रोहितने २०२४ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ९२ धावा केल्या होत्या. यादीत चौथ्या स्थानी पुन्हा विंडीजचा गेल आहे. त्याने २००९ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८८ धावा केल्या होत्या. या यादीत पाचव्या स्थानी न्यूझीलंडचा केन विलियमसन आहे. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०२१ मध्ये ८५ धावा केल्या होत्या.आयर्लंडकडून पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक वैयक्तिक धावा करण्याचा विक्रमही लॉर्कन टकरच्या नावावर आहे. याअ–धीही हा विक्रम त्याच्याच नावावर होता. त्याने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या २०२२ च्या सामन्यात ७१ धावा केल्या होत्या.

# भारत–ऑस्ट्रेलिया महिला संघांमधील टी–२० किती वाजता सुरू होणार?



दिल्ली–भारतीय संघ वुमन्स प्रीमियर लीग २०२५ नंतर आता ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेला आहे. दोन्ही संघांमध्ये टी–२० मालिका, एकदिवसीय मालिका आणि कसोटी सामनादेखील खेळवला जाणार आहे. टी–२० मालिकेने या मल्टी फॉरमॅट मालिकेला सुरूवात होणार आहे. हरमनप्रीत कौर या मालिकेत भारतीय संघाचं नेतृत्त्व करणार आहे. तर ऑस्ट्रेलियाची कमान आता सॉफी मॉलिन्यूकडे असेल. याचबरोबर ऑस्ट्रेलियाची नियमित कर्णधार एलिसा हिलीची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीपूर्वी अखेरची मालिका असेल.

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमधील टी–२० मालिकेला उद्या म्हणजेच १५ फेब्रुवारीपासून सुरूवात होत आहे. टी–२० मालिकेनंतर एकदिवसीय मालिका होणार आहे, २४ फेब्रुवारीला ब्रिस्बेन येथे पहिल्या सामन्याने मालिकेला सुरूवात होईल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना २७ फेब्रुवारी रोजी होबार्ट येथे खेळवला जाईल, तर तिसरा एकदिवसीय सामना १ मार्च रोजी खेळवला जाईल. महिला विश्वचषक उपांत्य फेरीनंतर हे दोन्ही संघ एकदिवसीय सामन्यात एकमेकांसमोर येण्याची ही पहिलीच वेळ असेल. ही मालिका ऑस्ट्रेलियाची महान फलंदाज एलिसा हिलीसाठी शेवटची मालिका असेल कारण तिने भारताविरुद्धच्या मालिकेनंतर सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमधील टी–२० मालिकेला उद्या म्हणजेच १५ फेब्रुवारीपासून सुरूवात होत आहे. या तीन सामन्यांची टी–२० मालिकेतील तिन्ही सामने १५ फेब्रुवारी, १९ फेब्रुवारी आणि २१ फेब्रुवारी रोजी खेळवले जातील. या टी–२० मालिकेतील सामने भारतीय वेळेनुसार दुपारी १.४५ वाजता खेळवले जातील. तर अर्धा तास आधी म्हणजेच १.१५ वाजता नाणेफेक होईल. ही मालिका स्टार स्पोर्ट्स चॅनेलवर तर जिओ हॉटस्टार ॲपवर लाईव्ह पाहता येणार आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकमेव कसोटी सामना ६ ते ९ मार्च दरम्यान पर्थ स्टेडियमवर खेळवला जाईल. या सामन्यानंतर भारतीय महिला संघाचा ऑस्ट्रेलिया दौरा संपेल.

ऑस्ट्रेलिया महिला विरुद्ध भारत महिला हेड–टू–हेड

एकूणसामने – ३५, ऑस्ट्रेलिया – २६, भारत – ७, बरोबरी – १, अनिर्णित – १

ऑस्ट्रेलियामधील संघांचा विक्रम,सामने – १२, ऑस्ट्रेलिया – ७, भारत – ४, बरोबरी – ०, अनिर्णित – १

भारत वि ऑस्ट्रेलिया महिला संघांच्या टी–२० मालिकेचं वेळापत्रक

रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ – पहिला टी२० सामना – ऑस्ट्रेलिया महिला विरुद्ध भारत महिला, सिडनी

गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ – दुसरा टी२० सामना – ऑस्ट्रेलिया महिला विरुद्ध भारत महिला,कॅनबेरा

शनिवार, २१ फेब्रुवारी २०२६ – तिसरा टी२० सामना – ऑस्ट्रेलिया महिला विरुद्ध भारत महिला, ॲडलेड

ऑस्ट्रेलियाविरूद्ध मालिकेसाठी भारताचा संघ

हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, रेणुका ठाकूर, श्रीचरणी, वैष्णवी शर्मा, क्रांती गौड, स्नेह राणा, दीप्ती शर्मा, रिचा घोष (यष्टीरक्षक), जी कमलिनी (यष्टीरक्षक), अरुंधती रेड्डी, अमनजोत कौर, जेमिमाह रॉड्रिक पाटील, फुफ्फुस पाटील, जेमिमा रॉड्रीग्ज, भारती फुलमाली, श्रेयंका पाटील



# स्कॉटलंडचे आव्हान इंग्लंडने १० चेंडू राखून परतवले

कोलंबो–टी–२० विश्व चषकाच्या अटीतटीच्या सामन्यात इंग्लंडने स्कॉटलंडचे आव्हान ५ गडी राखून मोडीत काढले. सलामीवीर आणि कर्णधार स्वस्त परतल्यानंतर टॉम बँटनने (नाबाद ६३) खिंड लढवत इंग्लंडला विजयापर्यंत पोहोच–वले. या विजयामुळे इंग्लंडने स्पर्धेत आपली दावेदारी अधिक मजबूत केली आहे. प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. जोफ्रा आर्चरने सुरुवातीलाच धक्के दिल्याने स्कॉटलंडची अवस्था १८२ अशी झाली होती. कर्णधार रिची बेरिंग्टनने (४९ धावा, ३२ चेंडू) डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र फिरकीपटू आदिल रशीदने ३६ धावांत ३ बळी घेत स्कॉटलंडच्या मधल्या फळीचे कंबरडे मोडले. शेवटच्या षटकांत ऑलिव्हर डेव्हिडसनने (२०ङ) केलेल्या फटकेबाजीमुळे स्कॉटलंडला १५२ धावांपर्यंत मजल मारता आली. १५३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचे दोन्ही सलामीवीर फिल साल्ट (२) आणि जोस बटलर (३) स्वस्तात बाद झाले.

# भारत–पाक सामन्याची क्रेज वाढली! कोलंबोला जाणाऱ्या विमानाचं तिकीट तब्बल १ लाखांच्या घरात

**कोलंबो १४ फेब्रुवारी–**भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे टी २० क्रिकेटमधील ग्रुप स्टेजचा सामना रंगणार आहे. या सामन्याकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागून राहिलेले असून या सामन्यासाठी क्रिकेट प्रेमी उत्साहित आहेत. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानने भारताविरुद्ध होणाऱ्या या सामन्यावर बहिष्कार टाकल्याने हा सामान होणार की नाही यावर शंकेचे ढग होते, मात्र आयसीसी सोबत झालेल्या बैठकीनंतर पाकिस्तानने हा सामना खेळण्यास होकार दिलाय. श्रीलंकेतील कोलंबो येथे रविवारी भारत – पाकिस्तान सामना होणार असून हा सामना स्टेडियममध्ये जाऊन पाहण्यासाठी क्रिकेट रसिक उत्साहित आहेत. त्यामुळे अनेकजण कोलंबोसाठी रवाना होत आ–हेत. मात्र यामुळे कोलंबोला जाणाऱ्या विमान प्रवासाचं तिकीट महागलं असून याची किंमत लाखांच्या घरात पोहोचलीये.

जर तुम्ही शेवटच्या क्षणी दिल्ली वरून कोलंबो येथे जाण्याचा विचार करत असाल तर तुमच्या खिशाला कात्री बसण्याची शक्यता आहे. दिल्लीहून कोलंबोला जाणाऱ्या विमानाचं राउंड ट्रिप तिकीट हे ९०,००० रुपयांपासून ते १ लाख रुपयांपर्यंत पोहोचलं आहे. तर मुंबईवरून जायचं असेल तर यासाठी प्रवाशांना तब्बल ७०,००० रुपये खर्च करावे लागतील. तर चेन्नई किंवा कोची वरून कोलंबोला जाणाऱ्या तिकीटाची किंमत जवळप–ास ५०,००० रुपये आहे. विशेषतज्ज्ञांचं म्हणणं आहे की १२ ते १६ फेब्रुवारी दरम्यान प्रवास करणाऱ्यांची संख्या ही सामान्य दिवसांच्या तुलनेत २२ टक्क्यांनी वाढली आहे.

# भारत- पाक सामन्याआधी सलमान आघाने केलेली 'ती' मागणी सूर्याने केली मान्य

**नवी दिल्ली:** भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणाऱ्या सामन्यातआधी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सूर्यकुमार याद–वने सलमान अली आघाची मागणी मान्य केली आहे.

कोलंबोतील आर.प्रेमदासा स्टेडियममध्ये भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांमध्ये आयसीसी हा सामना होणार नव्हता, पण अखेर पाकिस्तानला आयसीसीसमोर झुकावं लागलं आहे. त्यामुळे पाकिस्तानचा संघ भारतीय संघाचा सामना करण्यासाठी मैदानात उतरणार आहे. दरम्यान या सामन्याच्या एक दिवसाआधी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना कर्णधार सूर्यकुमार याद–वने अभिषेक शर्माच्या खेळण्याबाबत मोठी अपडेट दिली आहे.

भारतीय संघातील स्टार फलंदाज अभिषेक शर्मा अमेरिकेविरूद्ध झालेल्या सामन्यात खेळताना दिसून आला होता. या सामन्यात तो गोल्डन डकवर माघारी परतला होता. पण त्यानंतर नामिबियाविरूद्धच्या सामन्याआधी तो आजारी पडला होता. त्यामुळ तो दुसऱ्या सामन्यात खेळू शकला नव्हता. त्यानंतर पाकिस्तानविरूद्ध होणाऱ्या सामन्यात तो खेळणार नसल्याची चर्चा सुरू होती. पण सूर्यकुमार यादवने, अभिषेक शर्माच्या खेळण्याबाबत मोठी अपडेट दिली आहे. या सामन्यात अभिषेक शर्मा खेळणार आहे. असं झाल्यास भारतीय संघाची फलंदाजी आणखी बळकट होईल. असं झाल्यास संजू सॅमसनला





विश्रांती दिली जाईल. मुख्य बाब म्हणजे, सूर्यकुमार यादवने पत्रकार परिषद घेण्यापूर्वी पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघाने पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्याने अभिषेक शर्माला प्लेईंग ११ मध्ये स्थान देण्याबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. अभिषेक शर्मा अजूनही पूर्णपणे फिट झालेला नाही. पण पाकिस्तानचा कर्णधार म्हणाला, ङ्घ ङ्गआम्हाला सर्वोत्तम खेळाडूंचा सामना करायचा आहे. मी आशा करतो की, अभिषेक शर्मा पूर्णपणे फिट असेल आणि उद्या होणाऱ्या सामन्यात खेळताना दिसेल. आम्हाला मजबूत संघाविरुद्ध खेळायचं आहे.ङ्घ सलमान अली आघाने केलेली मागणी सूर्यकुमार यादवने मान्य केली आहे. ङ्गचला, तुम्हाला वाटतं ना अभिषेक शर्माने खेळावं, चालतंय. खेळवू त्याला आम्ही.ङ्घ सूर्यकुमार यादवने पत्रकार परिषदेत अभिषेक शर्मा खेळणार असल्याची माहिती तर दिली आहे. पण तो प्रत्यक्षात खेळणार की नाही, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. कारण त्याच्या फिटनेसबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

भारतीय फलंदाजांनी एकच काम करावं, ते म्हणजेःङ्घ, उस्मान तारिकचा सामना करण्यासाठी आर अश्विनने सांगितला स्मार्ट प्लॅन

पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आ–घाला हँडशेकबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. याबाबत बोलताना तो म्हणाला, ङ्गक्रिकेटमध्ये खेळ भावना असायला हवी. माझं वैयक्तिक मत फार महत्वाचं नसेल. पण क्रिकेट नेहमी आधी जसे होते तसेच खेळायला हवे. पुढे काय करायचं हे त्यांनी ठरवावं.ङ्घ याआधी झालेल्या आशिया चषक २०२५ स्पर्धेत दोन्ही संघ ३ वेळा आमनेसामने आले होते. या तिन्ही सामन्यांमध्ये भारतीय भारतीय खेळाडूंनी हँडशेक करण्यास नकार दिला होता. यावेळी हँडशेक होणार की नाही, हे देखील पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार - २०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार (राष्ट्रस्तरीय)**

रु.१ लाख रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार(उर्दू) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार(राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), समाज माध्यम पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पत्रकार सुधाकर डोईफोडे अग्रलेखन पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र).

**विभागीय पुरस्कार**

दादासाहेब पोतनीस पुरस्कार, (नाशिक विभाग)

५१ हजार रुपये , (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र,

या व्यतिरिक्त रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.), अनंतराव भालेराव पुरस्कार, (छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), आचार्य अत्रे पुरस्कार, (मुंबई विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, (पुणे विभाग) ५१ हजार रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), शि.म.परांजपे पुरस्कार, (कोकण विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.गो.जाधव पुरस्कार, (कोल्हापूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, (अमरावती विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, (नागपूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कॅम्पस ड्राईव्ह उत्साहात संपन्न, १७५ विद्यार्थ्यांचा सहभाग; गटचर्चा व ऑनलाईन परीक्षेद्वारे निवड प्रक्रिया

**लातूर/प्रतिनिधी :**द लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात दयानंद एज्युकेशन सोसायटीतर्फे जेड (जेएडीई) सॉफ्टवेअर कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडला. या उपक्रमासाठी एकूण १७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा तसेच ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे पार पडली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.प्रशांत मान्नीकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षण व रोजगार समन्वयक अनिल बिरादार, उपप्राचार्य डॉ.जी. आर. लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. एम.एस. अष्टेकर, संगणक विभागप्रमुख डॉ. एस.व्ही. स्वामी, व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. व्ही.बी. सातपुते तसेच सहाय्यक प्रा. डी.जे. शेख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या सत्काराने करण्यात आली. अनिल बिरादार यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. प्रमुख पाहुणे डॉ.दरगड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत भविष्यातील करिअर संधींबाबत माहिती दिली.

# ‘‘शिखरावर नेहमीच जागा असते’’ मेहनत, प्रामाणिकपणा आणि चिकाटी यांच्या बळावर आपण नक्कीच त्या शिखरावर पोहोचू शकतो : न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील मुट कोर्ट स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली. या स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती शैलेश प्रमोद ब्रह्मे यांनी केले.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना जीवनात शिस्तीचे महत्व विशद केले. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी हे काही ना काही घेऊन जाणार आहेत. जे जिंकतील ते आत्मविश्वास घेऊन जाणार आहेत आणि जे जिंकणार नाहीत ते अनुभव घेऊन जाणार आहेत. विजय सहज पचवला जातो परंतु पराभवातही शांत राहणारा, कधीही संयम न सोडणारा आणि आपल्या सहकाऱ्यांवर, प्रतिस्पर्ध्यांवर किंवा न्यायाधीशांवर टीका न करणारा, आपल्या चुकांचे मूल्यमापन करणारा व्यक्तीच खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतो. त्यामुळे ही मूल्ये आणि सद्गुण आत्मसात करण्याची गरज त्यांनी विशद केली.

आजच्या काळात महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. दरवर्षी हजारो विद्यार्थी पदवीधर होतात. अशा स्पर्धात्मक परिस्थितीत केवळ पदवी पुरेशी नसते, तर काहीतरी वेगळे, विशेष कौशल्य आणि उत्कृष्ट क्षमता विकसित करणे अत्यावश्यक असते. आपण स्वतःला अशा पद्धतीने घडवले पाहिजे की आपल्या व्यक्तिमत्त्वात वेगळेपण जाणवेल.

जीवनात आपल्याला अनेक वेळा संधी मिळते त्यावेळेस प्रयत्न करा, नक्कीच यश मिळेल. एक




दिवस असा येईल की अनेक संधी तुमच्यासमोर उभ्या राहतील, नवे मार्ग सापडतील. त्या संधी ओळखा आणि त्यांचा योग्य उपयोग करा.

यावेळी ते पुढे म्हणाले की विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांकडे प्रचंड ऊर्जा असते. तीच खरी ताकद आहे. सर्व अडचणींवर मात करण्याची क्षमता तुमच्यात आहे. जीवनाचा आनंद घेताना आपल्या करिअरला आणि व्यवसायाला मात्र अत्यंत गांभीर्याने घ्या. कायद्याचे सखोल ज्ञान आत्मसात करण्याबरोबरच युक्तिवाद कौशल्य विकसित करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. ‘‘शिखरावर नेहमीच जागा असते.’’ मेहनत, प्रामाणिकपणा आणि चिकाटी यांच्या बळावर आपण नक्कीच त्या शिखरावर पोहोचू शकतो असे सांगत सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या.

जेष्ठ विधीज्ञ आणि महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड. आशिष बाजपायी यांनी आपल्या मनोगतात भविष्यात मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी यापेक्षाही अधिक चांगल्या मुट कोर्ट स्पर्धेचा लातूर पॅटर्न तयार करणार असल्याचे सांगितले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पुनम नाथानी यांनी आपल्या मनोगतात दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या दूरदृष्टी पूर्वक नियोजनामुळेच अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यास प्रेरणा मिळते असे सांगितले. दयानंद विधी महाविद्यालय दरवर्षी अशा प्रकारच्या शैक्षणिक व स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याचे कार्य करत आहे. भविष्यातील सक्षम न्यायाधीश आणि वकील घडविण्यासाठी अशा स्पर्धा उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. या स्पर्धेसाठी राज्यातील व राज्याबाहेरील विविध ठिकाणाहून आलेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी स्वागत केले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री लक्ष्मीरमणजी लाहोटी व सचिव मा. श्री रमेशजी बियाणी यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. शैलेश ब्रम्हे यांचे स्वागत केले. व्यासपीठावर दयानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव ॲड. श्रीकांत उटगे, कोषाध्यक्ष संजय बोरा महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड. आशिष बाजपेयी, प्राचार्या पुनम नाथानी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. रवींद्र शेट्टी, सूत्रसंचालन सहयोगी प्रा. डॉ. शुभांगी पांचाळ यांनी तर आभार प्रदर्शन ॲड. मुस्तफा पठाण यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी ॲड. रवींद्र शेट्टी व ॲड. मुस्तफा पठाण यांनी कठीण परिश्रम घेतले.

# वंदे मातरम् ला राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे : बावस्कर

**लातूर/प्रतिनिधी :**रवींद्रनाथ टागोर यांनी जन - गण - मन ऐवजी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांची रचना असलेल्या वंदे मातरम् ला राष्ट्रगीत करा असे म्हटले होते. रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा प्रवास राहिलेल्या वंदे मातरम् ला आता राष्ट्रगीताचा दर्जा मिळवून देण्याची जबाबदारी प्रत्येक राष्ट्रप्रेमी भारतीयाची आहे, असे प्रतिपादन इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला २०२६ चे तृतीय पुष्प शुक्रवारी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पार्थ बावस्कर यांनी वंदे मातरम् - राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन या विषयावर गुंफले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे चे कुलसचिव डॉ. अमित शेष हे उपस्थित होते. मंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, सौ. प्राजक्ता सरदेशमुख, प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्राचार्य डॉ. रवींद्र शेंडगे,सुधीर धुतेकर, एस.डी. कुलकर्णी यांची उपस्थिती होती. उपस्थितांना अगदी मंत्रमुग्ध करताना पार्थ बावस्कर यांनी वंदे मातरम् या गीताच्या निर्मितीची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. वंदे मातरम् या राष्ट्रगीताने अनेक राष्ट्रभक्त निर्माण केल्याचे सांगताना त्यांनी वासुदेव बळवंत फडके, चंद्रशेखर आझाद, मदनलाल धिंग्रा, सूर्यसेन, अल्लुरी राजू, कनकलता बहुआ, मातंगिनी हजरा , तुळेश्वरी देवी अशा अनेक




क्रांतिवीरांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी वंदे मातरम् साठी प्राणांचे बलिदान दिल्याची माहिती पार्थ बावस्कर यांनी अनेक क्रांतिकारकांची उदाहरणे देऊन दिली.

वंदे मातरम् या शब्दाने ब्रिटिशांना अक्षरही सळो की पळो करून सोडले होते. वंदे मातरम् ला ब्रिटिशांनी भारतीयांच्या मनातून काढण्याचा प्रयत्न केल. मात्र, त्यात त्यांना यश आले नाही. वंदे मातरम् ची विद्यार्थी दशेतच प्रेरणा मिळाल्याने रा. स्व. संघाचे आद्य संस्थापक केशव बळीराम हेडगेवार यांच्यासारखे राष्ट्रप्रेमी युगपुरुष या भारतमातेला मिळाले. त्याकाळी ब्रिटिशांना आवरण्याचा मोठा लढा बंगालमधील संतांनी दिला होता, याचे स्मरणही त्यांनी करून दिले. वासुदेव बळवंत फडके यांनी स्वतःला राष्ट्र कार्यात झोकून देण्यामागची वास्तवताही बावस्कर यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिली. रवींद्रनाथ टागोर यांनी १८९६ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण वंदे मातरम् जाहीरपणे गायले होते,असेही त्यांनी सांगितले. वंदे मातरम् चा जयघोष करत असंख्य राष्ट्रभक्तांनी मृत्यूला कवटाळल्याचे सांगताना पार्थ बावस्कर यांचा कंठ भरून आला.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांनी वंदे मातरम् ला राष्ट्रगीत म्हणून मान्यता दिली नव्हती. आता त्याच क्रांतिकारी गीताचा प्रवास रिजेक्ट टू रिस्पेक्ट असा सुरु झाल्याचे त्यांनी गौरवाने नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. गोळवलकर गुरुजींच्या अतुलनीय कार्याची माहिती विशद करताना त्यांनी गुरुजी ज्या भागात प्रवास करत असत एकाच भाषेत बौद्धिक देत असल्याचे सांगताना गुरुजींना कधीही भाषेची चणचण जाणवली नसल्याचे नमूद केले. वंदे मातरम् ला त्याकाळी क्रांतिकारकांचा रक्तयज्ञ असेही संबोधले जात असल्याचे सरदेशमुख यांनी सांगितले. प्रा. शरद पाडे यांनी वंदे मातरम् गौरव गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन प्रल्हाद माले , राजश्री कुलकर्णी यांनी केले. डॉ. वृषाली देशमुख यांच्या संपूर्ण वंदे मातरम् ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## वीर परिवार सहाय्यता योजना २०२५ अंतर्गत आयोजित शिबिरात विधी सेवा विषयक मार्गदर्शन

**लातूर/प्रतिनिधी :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या वीर परिवार सहाय्यता योजना २०२५ अंतर्गत लातूर जिल्ह्यातील कार्यरत, सेवानिवृत्त सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना मोफत व सक्षम विधी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ११ फेब्रुवारी रोजी एक विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते. लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे झालेल्या या शिबीराचे आयोजन लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबीरास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.), पॅनल विधीज्ञ ॲड. एस. व्ही. सलगरे, माजी सैनिक संघटनेचे कृष्णा गिरी, जय जवान जय किसान माजी सैनिक संघटनेचे सयद शबीर, न्याय मित्र चरक सौदागर, तसेच वीर पत्नी, वीर माता-पिता, सेवानिवृत्त सैनिक यावेळी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री. गिरवलकर म्हणाले, वीर परिवार सहाय्यता योजना भारतीय सुरक्षा दलातील कार्यरत सैनिक, सेवानिवृत्त सैनिक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांना लागू आहे. मालमत्ता विवाद, शासकीय कल्याणकारी योजनांशी संबंधित प्रकरणे, कौटुंबिक वाद, दिवाणी स्वरूपाचे इतर वाद यांसारख्या बाबींसाठी संबंधित विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत व सक्षम विधी सेवा पुरवली जाते. योजनेच्या तरतुदीनुसार, लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात विधी सेवा क्लिनीक स्थापन करण्यात आले आहे. कार्यरत, माजी सैनिक तसेच शहीद जवानांच्या कुटुंबियांना सन्मानाची वागणूक मिळावी आणि त्यांना कायदेशीर अडचणींमध्ये सहज मदत उपलब्ध व्हावी यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना मोफत विधी सेवा पुरविण्यास लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, लातूर कटिबद्ध असल्याचे श्री. गिरवलकर यांनी सांगितले. सूत्रसंचालन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक एस. व्ही. घोंगडे यांनी केले.

# दयानंद वाणिज्य मध्ये ‘‘कला आणि कौशल्य’’ कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवती कल्याण मंडळाचा पुढाकार; ७० विद्यार्थिनींचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :**दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयात युवती कल्याण मंडळाच्या वतीने ‘‘कला आणि कौशल्य’’ या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थिनींमधील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मार्गदर्शन करताना कला आणि कौशल्य यांचे वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यातील महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या दोन दिवसीय कार्यशाळेत चॉकलेट बुके, फोटो बुके, रेझिन आर्ट वर्क, उलन पॅच रांगोळी अशा उपक्रमांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. एकूण ७० विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उपक्रमांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, बीबीए-एमबीए विभाग प्रमुख वैशाली सातपुते, बीसीए-एमसीए



विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी तसेच युवती कल्याण मंडळाच्या प्रभारी डॉ. प्रिया वर्मा मंचावर उपस्थित होते. समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली शरणार्थी यांनी केले, तर प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गीतांजली जोशी, प्रा. दिपाली शेख, प्रा. स्नेहल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. ही कार्यशाळा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी व उपयुक्त ठरली असून, भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्याचा मानस संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

# प्रभावी रिझ्युम बनवा अन् करिअर घडवा - डॉ.ज्ञानेश्वर चौधरी

## दयानंद विज्ञानमध्ये इंग्रजी विभागातर्फे यशासाठी एक प्रभावी रिझ्युम तयार करणे कार्यक्रम

**लातूर/प्रतिनिधी :** सध्याचे युग स्पर्धेचे युग असले तरी करिअर घडविण्यासाठी आज एकविसाव्या शतकात अनेक क्षेत्र खुले आहेत.आपापल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविले पाहिजे.म्हणूनच मुलाखत व नोकरीसाठी प्रत्येकांनी प्रभावी रिझ्युम तयार करणे अत्यंत गरजेचे आहे.रिझ्युममध्ये स्वत:चे नाव,संपर्क माहिती, करिअरचे उद्दिष्ट,कामाचा अनुभव,शिक्षण आणि कौशल्ये यांचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे.तांत्रिक आणि सॉफ्ट स्किल्स याचीही नोंद केली पाहिजे.रिझ्युममध्ये व्याकरण आणि स्पेलिंगच्या चुका टाळल्या पाहिजेत,असे प्रतिपादन निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले.


येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने दि.१३ फेब्रुवारी




२०२६ रोजी यशासाठी एक प्रभावी रिझ्युम तयार करणे या उद्बोधनपर व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले होते.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.त्यांनी रिझ्युमच्या विविध प्रकारांचे विश्लेषण केले. तसेच रिझ्युम,बायोडाटा आणि सी.व्ही. यातील फरक स्पष्ट केला. प्रभावी रिझ्युम राईटिंगसाठी महत्वपूर्ण टिप्स दिल्या ज्या विद्यार्थ्यांना भविष्यात फायदेशीर ठरतील.

याप्रसंगी व्याख्यान कार्यक्रम समन्वयक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.मेघा पंडित,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,मराठी विभाग प्रमुख डॉ.रामशेट्टी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.मेघा पंडित यांनी केले तर आभार वेदांगी वाघे या विद्यार्थीनीने मानले.या कार्यक्रमासाठी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.अवंती बिडकर यांचेही सहकार्य लाभले.यावेळी सुनील राक्षे, राजेसाहेब पांचाळ यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व बी.एस्सी.,बीसीएस.,बायोटेकचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# पोदार मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा मोठ्या थाटात समारोप



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)-पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव यांच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली 'उत्सव - साजरा करण्याची वेळ' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पर्यटन व विविध संस्कृतींच्या रंगांनी नटलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा ठरला. या स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून धाराशिवच्या पोलीस अधीक्षक मा. सौ. ऋतु खोखर उपस्थित होत्या. तसेच पोदार एज्युकेशन नेटवर्क (लातूर हब) चे जनरल मॅनेजर प्रसाद पोंक्षे हेही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी 'गेस्ट ऑफ ऑनर' म्हणून प्राचार्य श्री. कीर्तीकुमार देशमुख - आंबेजोगाई, प्राचार्य श्री. गिरिधर रेड्डी - लातूर, प्राचार्या सौ. रम्या तुतीका - कातपूर, लातूर, प्राचार्य श्री. सुदर्शन खणगे - परभणी, प्राचार्य श्री. समरेंद्र पानीग्रही - सोलापूर, आणि उद्योजक मा. श्री. आनंद कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. हा कार्यक्रम बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे.

शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमसे तसेच पोदार धाराशिव येथील शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा पार पडला. विद्यार्थ्यांच्या नृत्य, संगीत व सांस्कृतिक सादरीकरणांनी सजलेला हा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा पालक व नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वाती वाकेकर मॅडम यांनी केले तसेच या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी स्कूलचे उपप्राचार्य श्री. निलेश जाधव सर, वरिष्ठ समन्वयक श्री प्रभाकर चौधरी सर, व्यवस्थापकीय अधिकारी श्री जीवन कुलकर्णी सर, श्री प्रदीप शिंदे सर, या दोन दिवशीय कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व देखरेख कार्यक्रमाधिकारी श्री दीपक अंकुश सर यांनी केले.

# लोककला महोत्सव की अव्यवस्थेचा तमाशा? - ढिसाळ नियोजनामुळे कलाकार संतप्त, प्रशासनावर प्रश्नचिन्ह

**जिल्हास्तरीय लोककला महोत्सवात गोंधळ; स्थानिक कलाकारांना डावलल्याची टीका**
**घाईगडबडीत उरकला लोककला महोत्सव; ना सन्मान, ना योग्य संधी**
**नियोजनाचा बोजवारा! लोककला महोत्सवावर कलाकारांची तीव्र नाराजी !**
**प्रसिद्धीशिवाय महोत्सव, कलाकारांचा अपमान; प्रशासनाच्या कारभारावर संताप !**

कळंब (प्रतिनिधी)- शहरात मोठ्या गाजावाजात आयोजित करण्यात आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण लोककला महोत्सवावर ढिसाळ नियोजनाचे सावट दिसून आले. गुरुवारी सुरू झालेल्या या महोत्सवाची शुक्रवारी दुपारी घाईघाईत सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या नियोजनातील विस्कळीतपणामुळे कलाकारांमध्ये नाराजीचा सूर उमटला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत उपकेंद्र धाराशिव येथील विद्यार्थ्यांनाच कला सादर करण्याची संधी देण्यात आली. दुसऱ्या दिवशी मात्र कळंब तालुक्यातील एकाच कलाकाराला तब्बल तीन प्रकारांत सादरीकरणाची संधी देण्यात आली, तर दुसऱ्या कलाकाराला दोनदा व्यासपीठ मिळाले. इतर अनेक स्थानिक कलाकारांना मात्र संधीच नाकारण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. दोन दिवस कसाबसा ताळमेळ घालत महोत्सव उरकण्यात आल्याची टीका होत असून आयोजकांनी सुटकेचा निश्वास टाकल्याचे चित्र होते.

***स्थानिकांना डावलून महोत्सवाचा काय उपयोग?***

*शहरात एवढ्या मोठ्या महोत्सवाचे आयोजन करताना प्रशासनाने या क्षेत्रात काम करणाऱ्या स्थानिक कलाकारांना अवगत करून सहभागी करणे अपेक्षित होते. मात्र नियोजन करणारे कोण आणि कलाकारांची निवड कशी झाली, याची माहिती कुणालाही देण्यात आली नाही. किमान येथून पुढे तरी पारदर्शकता आणि योग्य नियोजन व्हावे, अशी अपेक्षा आहे.*

***- ह. भ. प. महादेव महाराज आडसुळ, जिल्हाध्यक्ष, जेष्ठ नागरिक संघ, धाराशिव.***

**गाजावाजा नाही, रसिकांपर्यंत माहितीच नाही**

तालुक्यात लोककलेचे असंख्य रसिक असताना कोणतीही ठोस प्रसिद्धी न करता कार्यक्रम उरकण्यात आल्याची खंत व्यक्त होत आहे. ऐन परीक्षांच्या तोंडावर विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना पाचारण करून रिकाम्या खुर्च्या भरल्या गेल्या. विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचा आनंद मिळाला खरा; मात्र रसिकांना संधी न दिल्याने आयोजकांच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सन्मानचिन्ह; कलाकारांचा संताप**

**लोककला जिवंत राहाव्यात आणि पुढील पिढीला त्यांची ओळख व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आला होता. कलाकारांना मानधन दिले जाईल, असे सांगण्यात आले; मात्र प्रमाणपत्र नंतर देऊ असे सांगितले गेले, तर सन्मानचिन्हाबाबत कोणतेही नियोजन नसल्याचे समोर आले. अशा विस्कळीत कार्यक्रमांपेक्षा न केलेलेच बरे, अशी तीव्र प्रतिक्रिया अनेक कलाकारांनी व्यक्त केली.**

**एकूणच, लोककलेच्या संवर्धनाच्या नावाखाली झालेल्या या महोत्सवाने प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भविष्यात तरी स्थानिक कलाकारांना न्याय देत सुयोग्य नियोजन केले जाईल का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

# लोहाऱ्यात महाशिवरात्री यात्रा: शोभायात्रा, दीपोत्सव,कीर्तन, कुस्ती, मॅरेथॉन, भारूड, नृत्य स्पर्धा



लोहारा(प्रतिनिधी)-लोहारा शहरात महाशिवरात्री यात्रा महोत्सवात दि. १५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शोभायात्रा, दीपोत्सव, कीर्तन, कुस्ती, मॅरेथॉन, रांगोळी, भारूड व नृत्य स्पर्धांबरांबरच विविध धार्मिक कार्मक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रा महोत्सवाचे हे २६ वे वर्ष आहे. या रौप्य महोत्सवी यात्रा महोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. रविवारी (दि. १५) यात्रा महोत्सवाची सुरुवात शोभायात्रेने होणार आहे. सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात आगमन होताच महादेवाची आरती होईल. त्यानंतर ही शोभायात्रा जुन्या गावातील प्राचीन महादेव मंदिरापर्यंत काढण्यात येणार आहे. दुपारी १२ वाजता भारुडाचा कार्यक्रम होईल. त्याच दिवशी सायंकाळी सहा वाजता दीपोत्सव होणार आहे. याच दिवशी राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा होणार आहे. दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि. १६) सकाळी साडेअकरा वाजता भुजंग महाराज पळसकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. दुपारी ४ वाजता जंगी कुस्त्यांचा फड रंगणार आहे. शेवटची कुस्ती विजेत्या मल्लास महादेवाची चांदीची पिंड शिवशंकर जट्टे कुटुंबीयांकडून देण्यात येणार आहे. उपविजेत्यास लोहारा खुर्द येथील संजय रसाळ यांच्या वतीने रुपये ५००० व स्मृतिचिन्ह देण्यात येणार आहे.

मंगळवारी (दि.१७) सकाळी ७ वाजता मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. सायंकाळी चार वाजता भारतमाता मंदिराच्या पाठीमागील हायस्कूल लोहाराच्या मैदानावर इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. या सर्व कार्यक्रम व स्पर्धांचा परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. या यात्रा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे.

बुधवारी भारुडाच्या कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी (दि. १८) सकाळी १० वाजता श्री बसवेश्वर मंदिर येथे महिलांसाठी खुल्या रांगोळी स्पर्धा व व्यंगचित्र, छायाचित्र प्रदर्शन होणार आहे. रात्री सात वाजता भव्य जंगी जुगलबंदी हा भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. पाचव्या दिवशी गुरुवारी (दि. १९) सायंकाळी सात वाजता हायस्कूल लोहारा शाळेच्या मैदानावर भव्य खुल्या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा होणार आहे.

# विद्यार्थ्यांनी 'आनंद बाजारात' केली तब्बल पावणे दोन लाखांची उलाढाल

परंडा धाराशिव (प्रतिनिधी)- येथील राजे शिवाजी पब्लिक स्कूलच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'आनंद बाजार' हा उपक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी तब्बल १ लाख ७६ हजार ९६० रुपयांची उलाढाल करत आपली उद्योजकता आणि व्यावहारिक कौशल्य सिद्ध केली.

गुरुवारी (दि.१२) आयोजित करण्यात आलेल्या या आनंद बाजार मार्केट डे उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक ज्ञानाची जाणीव निर्माण करणे तसेच उद्योजकतेची आवड विकसित करणे हा होता. विद्यार्थ्यांनी स्वतः विविध प्रकारची दुकाने थाटून विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. कार्यक्रमास संस्थापक बिभीषण रोडगे, सपोनि प्रविण सिरसट, प्रफुल्ल गोडगे तसेच मुख्याध्यापिका मनिषा बनसोडे उपस्थित होत्या. यावेळी बबलू जिनेरी, बाबा बहिरे, हाफिजद्दीन करपुडे हे नामांकित व्यापारी तसेच पालक सुदाम पाटील, विनोद पाटील, अंगद नलवडे, सचिन मोरे, आबा जगताप, नेमीनाथ मोरे, सुनिल पाटील, पारसराम कोळी, दत्ता नेटके, बालाजी मिस्कीन, आरिफ डोंगरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद बाजारात शेकडो विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ, खेळणी, शैक्षणिक साहित्य, हस्तकला वस्तू आदी विविध आकर्षक वस्तूंची दुकाने सजवली होती. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने विक्री करत ग्राहकांशी संवाद साधला. स्पर्धेत मोरे अथर्व सचिन यांनी प्रथम क्रमांक पटकावला, सुरवसे अनुष्का गणेश यांनी द्वितीय क्रमांक मिळवला, तर सूर्यवंशी प्रणव व बुरंगे राघव अनंतराव यांनी तृतीय क्रमांक मिळवला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक नारायण खैरे यांनी केले. सूत्रसंचालन संजय वलेकर यांनी प्रभावीपणे पार पाडले, तर आभार प्रदर्शन शुभम रोडगे यांनी केले.

व्यावहारिक शिक्षणाचा अनुभव विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये आणि उद्योजकतेची जाणीव देण्यासाठी शाळांमध्ये नियमित उपक्रम राबवणे महत्त्वाचे आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना उत्पादन, विक्री, ग्राहक संवाद आणि पैशाचे व्यवस्थापन यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. तसेच संघभावना आणि नेतृत्व गुण विकसित होतात. शैक्षणिक अभ्यासाबरोबरच जीवन कौशल्ये शिकण्याची संधी उपलब्ध करून देते, ज्यामुळे लहान वयातच व्यावसायिक विचारसरणी आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढते.

## 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१३ फेब्रुवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २६८ कारवाया करुन २,०५,५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

**१) रुग्णवाहिका २२३९७६**
**२) रक्तपेढी २२३९७६**
**३) जिल्हा रुग्णालय २२६९२७**
**४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९**
**५) अग्नीशामक विभाग २२२१०१**
**६) रेल्वेस्टेशन २४०९९९**
**७) एसपी कार्यालय २२७६२०**
**८) जिल्हाधिकारी का.२२४५०१**
**९) तहसिल का. २२७८८२**
**१०) जि.प. २२५४०७**
**११)नगरपरिषद २२५४०७**
**१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४**
**१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६**
**१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २**
**१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८**
**१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७**
**१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४**
**१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५**
**१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४**
**२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६**
**२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६**
**२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२**
**बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११**
**२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०**
**२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२**
**२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८**
**२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३**
**२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०**
**२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२**
**२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४**
**३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४**

# एसटीच्या प्रवासात होतेये दिव्यांगांची पिळवणूक

भूम (प्रतिनिधी)- एसटीच्या प्रवासादरम्यान अनेक वाहकांकडून दिव्यांग प्रवाशांची छळवणूक तसेच पिळवणूक होत असल्याचे सांगत अशा उध्दट वाहकांवर कारवाई करण्याची मागणी दिव्यांग संघटनेने केली आहे. या मागणीसाठी त्यांनी शहरात निदर्शने केली. महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेच्या वतीने परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांना उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत निवेदन देण्यात आले. भूम येथील राज्य परिवहन आगार प्रमुखांनाही निवेदन सादर करण्यात आले आहे. प्रवासादरम्यान दिव्यांगांची होत असलेली पिळवणूक तत्काळ थांबवून संबंधित कर्मचारी व वाहकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शासनाने दिव्यांग ओळखपत्राची पडताळणी भ्रमणध्वनीवरील संगणकीय प्रणालीद्वारे करण्यास परवानगी दिली आहे. मात्र काही कर्मचारी जाणूनबुजून क्रमांक किंवा जन्मतारीख चुकीची नोंदवून ओळखपत्र बनावट असल्याचे सांगतात. पूर्ण भाडे भरण्यास भाग पाडणे, बसमधून उतरविण्याची धमकी देणे किंवा ओळखपत्र जप्त करण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिव्यांगांना बसमध्ये चढ-उतार करताना मदत न करणे, राखीव आसनाबाबत सहकार्य न करणे तसेच पडताळणी प्रणालीचा चुकीचा वापर करून अपमान करणे, असे प्रकार थांबवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.दोषींवर तातडीने कारवाई न झाल्यास राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला निवेदन देताना महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप डोके, संस्थापक सचिव रियाज पठाण, राज्य समन्वयक रामहरी चव्हाण, जिल्हाध्यक्ष पांडुरंग मिसाळ, मंगल शिंदे,याशिन बादेला, हनुमंत बोराडे, महिला तालुकाध्यक्ष सुषमा पाटील, विश्वनाथ माळी, केरबा चिखले, सलीम बादेला, अरुण अंधारे, तस्लिम जहागीरदार, रेशमा अलहमीद, आण्णासाहेब माने, हनुमंत रोडगे, अर्जुन झिटे, राजू टाळके, सिंधू टाळके, सूर्यकांत कोळी आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# विकास आराखड्याच्या १०७ पैकी केवळ ४७ मालमत्तांची मोजणी

तुळजापूर (प्रतिनिधी)-तुळजापूर मालमत्ताधारकांचा असहकार्यामुळे विकास आराखड्यासाठी संपादित करावयाचा मालमत्तांची मोजणी प्रक्रिया अतिशय संथ गतीने सुरू असून, आजतागायत १०७ पैकी केवळ ४७ मालमत्तांची मोजणी करण्यात आली आहे. दरम्यान मालमत्ताधारकांनी मोजणीस सहकार्य न केल्यास सक्तीचे भूसंपादन करण्याचा पर्याय खुला असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तीर्थक्षेत्र तुळजापुरातील भविष्यातील वाढती भाविक संख्या विचारात घेऊन तब्बल १८६५ कोटी रुपयांचा तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. यासाठी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर भूसंपादन करण्यात येणार असून, गेल्यावर्षी २ ऑगस्ट रोजी खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध केली होती. दरम्यान पालिका निवडणुकीनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून, भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. पर्यवेक्षक भूमापक गौरव बनसोडे यांचा नेतृत्वाखाली भूमी अभिलेख कार्यालयाचे एक पथक मालमत्तांची प्रत्यक्ष मोजणी करत आहे. भीमनगर, खटकाळ गल्ली भागातील १०७ पैकी केवळ ४७ मालमत्तांची मोजणी करण्यात आली आहे. सध्या केवळ संपादित जागेचे क्षेत्रफळ मोजण्यात येणार असून, त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभाग बांधकामाचे मूल्यांकन करणार आहे. मशीनच्या सहाय्याने मोजणी भूमीअभिलेखचे पथक मालमत्तांची प्रत्यक्ष मोजणी करत असून, मशीनचा सहाय्याने अचूक मोजणी करण्यात येत आहे. मोजणीसाठी भूमी अभिलेखचा तीन कर्मचाऱ्यांसोबत मंदिर संस्थानचा एक कर्मचारी देण्यात आला आहे.

प्रशासनाकडून वेळकाढूपणा : वास्तविक पाहता प्रशासनाने संपादित मालमत्तांची मोजणी तसेच बांधकामाचे मुल्यांकन एकाचवेळी करणे अपेक्षित होते. यासाठी भुमी अभिलेख व सार्वजनिक बांधकाम चे संयुक्त पथक तयार करणे आवश्यक होते. मात्र असे न करता सुरवातीला केवळ क्षेत्रफळ मोजण्यात येत असून नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग बांधकामाचे मुल्यांकन करणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दराबाबत जागामालकात संभ्रम विकास आराखड्यासाठी करण्यात येणार असलेल्या भुसंपादनात नक्की किती दर देण्यात येणार? या बाबत प्रशासनाने स्पष्ट न केल्याने मालमत्ताधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. मंदिर परिसरातील मौल्यवान मालमत्ता अधिग्रहित करण्यात येणार असल्याने देण्यात येणारा दर, जागेचा बदल्यात जागा आदी धोरण स्पष्ट करण्याची मागणी मालमत्ता धारकातून करण्यात येत आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649